जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे ।
दिनांक :- १४ नोव्हें १९९१

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
जिल्हा परिषद,

विषय : सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ : शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. ~~३०९१~~ व्हीएलएस १०९१/५९९६७/प्राशि-3 दि. ४/११/९१ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधिचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेले सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खाली नमूद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९१ पासून । ली ते सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरू असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरू करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याचा शर्तीवर विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथ. शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
| --- | --- | --- | --- |
| शिवनदास रेवाचंद धर्माजी एज्युकेशन ट्रस्ट पिंपरी | सिंधीबाई प्राथ. शाळा पिंपरी | १ली ते ९१-९२ या शै. वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह | इंग्रजी |

1) संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिले.

2) संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली 1949 मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

3) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाची उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादि काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

4) संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

5) ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

1) संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम 1860 व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम 1950 प्रमाणे नोंदणी कृत असली किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 प्रमाणे नोंदणीकृत असावी.

4) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात - घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

5) शाळेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

6) संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. (यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून द्यावा.)

7) शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रू. 100/- दंड संस्था कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. सदर प्राथमिक शाळेत प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही दिनांक ३/१२/८७ पर्यंत पूर्ण करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल दिनांक १५/१२/८७ पर्यंत या कार्यालयास पाठवावा. संस्थेने वरीलपैकी कोणतीही अट पालन करण्यास असमर्थता दर्शविली तर संस्थेला दिलेल्या परवानगीचा फेरविचार तात्काळ करावा व तसा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

सही/-
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे ।

---

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
शिक्षण/प्राप्राशा/10/१८१/८७
दिनांक :- २८/११/८७

[Stamp: शिक्षण मंडळ कार्यालय, पिंपरी-१८, पिंपरी चिंचवड महानगरपालिका]

प्रति,

1) संबंधित विभागीय पर्यवेक्षक.

उपरोक्त आदेशामध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन करणेबाबत आपल्या विभागातील संबंधित शाळेला सूचना देऊन तसा पूर्तता अहवाल त्वरित द्यावा.

२) मा. सचिव
शिवदासन रेवाचंद शर्माजी
ट्रस्ट, पिंपरी, पुणे

[signature]

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 18.

शिक्षण मंडळ कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क्र. शि/खाप्राशा/[illegible]/का वि/12/93
दिनांक :- 20/5/93

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका

सिस्टरबाई इंग्लिश स्कूल
पिंपरी पुणे

विषय : मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत पत्र

संदर्भ : आपले — तुकडी मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

2/- वरील संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या शाळेने मागणी केलेल्या जादा तुकड्या व नैसर्गिक वाढ या प्रस्तावाची छाननी केलेली असून मा. शिक्षण उपसंचालक यांनी पत्र क्र. प्रा/प्राशि/आ.तु/तीआर/९२ दिनांक १५/2/१९९३ अन्वये खालीलप्रमाणे जादा तुकडी/नैसर्गिक वाढीने वर्गास जून १९९२ पासून परवानगी देणेत येत आहे/परवानगी नाकारण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | मागणी केलेल्या तुकडी/ नैसर्गिक वाढ | मंजूर केलेल्या/नामंजूर केलेल्या तुकडी व नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सिस्टरबाई इंग्लिश स्कूल पिंपरी. | इ. ७वी | नैसर्गिक वाढ * | मंजूर विनाअनुदान. |

* पट संख्या वाढविल्याशिवाय अनुदान मंजूरी देण्यात येत नाही.

वरील मान्य/अमान्य तुकड्या/नैसर्गिक वाढीचे वर्गातील सरासरी हजेरीची अट पूर्ण करून तसे उलट टपाली या कार्यालयास कळवावे.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

तातकाळ
=======

जा.क्र.माध्य-३[१४]नमाशा/मान्यता/पुवि/९३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-४११ ००१ यांचे कार्यालय
दिनांक:- ४ / ३ /१९९४

-7 MAR 1994

प्रति,

सचिव,
शिवदास सेवाचंद धर्माजी
एज्युकेशन ट्रस्ट, पिंपरी, पुणे-४११ ०१७

विषय:- सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नविन
माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत....

संदर्भ:- शासन पत्र क्र एसएसएन/१०९३/३४५०/माशि/१
दिनांक ~~२/जुलै/१९९३~~ १८/२/९४

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदिला अपवाद करुन खालील दर्शाविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९३ पासून ~~विना अनुदान तत्वावर~~ /कायम विना अनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबीची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येतआहे.

१] ~~या नविन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त]शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एसएसएन १०८८/१६६९-एन माशि-१ दिनांक १०/२/८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.~~

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे[उदा: विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतइ.]काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.]फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही.अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमी पत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठीवलेले प्रवेश प्राधान्याचे देण्यात यावेत तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्याकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था[प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज]कायदा१९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्याकडून जमा करण्यात येवू नये.

७] १.माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

९] शिक्षक /कर्मचारी संघ शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांचेकडून मंजूर करुन घेण्यात येईल..

१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यावयात व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११] शालेय वातावरण ,इमारत प्रयोगशाळा इ.बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

१२] माध्यमिक शाळा संहिता कलमं ४९.३ अन्वये मा.शिक्षण संचालक,यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी
=======

[१] संबंधित संस्था,मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबात एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

वरील बाबी पैकी,एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.न. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | शिवणदास रेवाचंद धर्मजी एज्युकेशन ट्रस्ट, पिंपरी, पुणे ४११ ०१७ | पिंपरी | आठवी जून१९९३ पासुन | इंग्रजी कायम, विना अनुदान |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहीत प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे.तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९४.९५.
पुणे, दि. १७/८/९५

प्रति,
सचिव,
~~धर्मांणि एज्यु. ट्रस्ट~~
~~पिंपरी. पुणे १८~~

विषय :- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता. ९४-९५.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या ~~शिवनदान रेवाचंद धर्मांणि एज्यु. ट्रस्ट~~च्या माध्यमिक विद्यालयातील इ. ८ वी च्या वर्गास मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे आदेश क्र. मध्य ३(७०) नमाशा/मान्यता/पुवि/९३ दि. ७/३/९४ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२. नुसार उपरोक्त शाळेस जून १९९४ पासून इ. ९वी च्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१] विद्यार्थी संख्येत वाढ करणेत यावी.
२] ग्रंथालयासाठी पुस्तके खरेदी करणेत यावीत.
३] अध्यापनात शैक्षणिक साधनांचा जास्तीत जास्त
४]
५] वापर असावा.
६]

मा. शि. अ. यांची
मान्य टिपणी.

[signature]
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे.

प्रत,
१. मुख्याध्यापक,
~~सिक्कीबाई धर्मांणि विद्यालय, पिंपरी.~~
~~पुणे १८.~~
२. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १.

(22)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे-१०

क्रमांक पुविमं/शाखा डीपी/मान्यता
पुणे - ४११०१०
दिनांक : ११/१०/९५

प्रति

मुख्याध्यापक / ~~मुख्याध्यापिका~~,
~~सिक्कीबाई धर्माणी हायस्कूल~~
~~पिंपरी, पुणे १८~~

विषय : माध्यमिक शाळेस मान्यता व सांकेतिक क्रमांक देण्याबाबत. . . .
( नवीन सांकेतिक क्रमांक 22.609 सन १९९६ पासून )

महोदय/महोदया,

मंडळ नियमावली नियम क्रमांक २८ (१) अन्वये आपण या मंडळाची प्रथम मान्यता मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, मार्च १९९६ मध्ये होणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस विद्यार्थी पाठविण्याकरीता आपल्या माध्यमिक शाळेस शिक्षण खात्याने घातलेल्या अटी व त्याशिवाय खालील अटींवर 22.609 हा तात्पुरता सांकेतिक क्रमांक मराठी / इंग्रजी / उर्दू या माध्यमासाठी सन १९९६ साठी देण्यात येत आहे. यापुढे या कार्यालयाशी पत्र व्यवहार करताना माध्यमिक शाळेचा वरील निर्धारित सांकेतिक क्रमांक असणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

(१) माध्यमिक शाळा संहितेमधील नियम ३, २ (६, ७, ८ ) च्या तरतुदीनुसार सर्व अटी पूर्ण केलेल्या असल्या पाहिजेत.

२) प्रमाणानुसार पुरेशी विद्यार्थी संख्या आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनिमय १९७७ च्या क्रमांक २८ (७) अन्वये सर्व अटी पूर्ण असल्या पाहिजेत.

३) मंडळाच्या परीक्षेच्या वेळी ज्या केंद्रावर आपल्या शाळेचे विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट होणार असतील, त्या केंद्रावर पुरेसे फर्निचर स्वखर्चाने पोचविण्याची जबाबदारी आपली राहील.

केंद्रावरील बैठक व्यवस्था किंवा फर्निचरसाठी आपले सहकार्य नसल्यास ही मान्यता पूर्वसूचना न देता विनियम २८ (११) अन्वये रद्द केली जाईल.

४) मंडळाच्या परीक्षेसाठी ज्या ज्या वेळेस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवेची आवश्यकता असेल, त्या त्या वेळी ती प्राधान्याने दिली पाहिजे. प्रचलित नियमा-

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११ ००५.

क्रमांक : पुविमं/डीपी/सां. क्र./
पुणे ४११ ००५.
दिनांक : २०/०८/२००३.

प्रति,

मुख्याध्यापक / ~~प्राचार्य,~~
------------------
---11-701------
------------------

विषय : शाळा क्रमांक / कनिष्ठ महाविद्यालय, क्रमांकामध्ये तालुका/शाळा सांकेतिक क्रमांक समाविष्ठ करून नविन क्रमांक देणेबाबत......

माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेकरिता मंडळ कार्यालयाने आपणास दिलेले शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांक प्रशासकीय कारणास्तव बदलण्यात आलेला असून यापुढे आपणास पुर्वीचा ---11-701------ऐवजी--11-16-052 हा नवीन सांकेतिक क्रमांक देण्यात येत आहे.

तरी वरीलप्रमाणे शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सांकेतिक क्रमांकाचा झालेला बदल शाळेच्या मुखपृष्ठावर (लेटरहेड ) वर शाळेचा पुर्वीचा सांकेतिक क्रमांक व ~~नवेन~~ नविन सांकेतिक क्रमांक असे दोन्ही सांकेतिक क्रमांक छापावेत. तसेच फेब्रुवारी/मार्च २००४ परीक्षेची आवेदनपत्रे नविन शाळा सांकेतिक क्रमांकानुसार मंडळाकडे पाठविण्यात यावीत याची नोंद घ्यावी. तसेच शासकीय व पत्रव्यवहारासाठी पुर्वीच्या व नविन सांकेतिक क्रमांकाचा उल्लेख करावा. तसेच ~~सोबतचे परिशिष्ठ अ व ब त्वरित सादर करावे.~~

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,

जा. क्र. माध्य. ३/प्रथम मान्यता/पुणे
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे :- १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 17 APR 1995

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, ---------------
पुणे.

विषय :- प्रथम मान्यता.
[illegible] हायस्कूल, पिंपरी.

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/८वी/९४-९५, दिनांक ७/१/९५.

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये [illegible] एज्यु. ट्रस्ट, --------------- संस्थेच्या [illegible] --------------------------------- माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी /९वी//१०वी च्या वर्गास सन १९९ - १९९ या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयावार प्रयोगशाळा सर्व साहित्यानीशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३] शाळेसाठी क्रिडांगण असावे.
१४] विविध परिक्षा, स्पर्धा यात विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.
१५] विद्यार्थी संख्या पुरेशी वाढवावी.

स्वाक्षरी [illegible] सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- मुख्याध्यापक, ---------------------------

[Spl.—CC BPT 2

№ ~~018662~~

## नोंदणीचे प्रमाणपत्र

...हे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) याअन्वये पुणे विभाग पुणे येथील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीनें नोंदण्यात आली आहे.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे नाव शिवनदास रेवाचंद धर्मानी एज्युकेशनल ट्रस्ट, १५ शांतीवन को ऑप हौसिंग सोसायटी लि पिंपरी कॉलनी, पुणे ४११०१७.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक ११८८ (पुणे)

श्री. दौलत धमनदास धर्मानी १५ शांतीवन को ऑप हौसिंग सोसायटी लि पिंपरी कॉलनी पुणे ४११०१७ यांस प्रमाणपत्र दिले.

दिनांक २० जून १९८८ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

सही [signature]

धर्मादाय उप-आयुक्त

हुद्दा पुणे विभाग, पुणे

ठिकाण

CHARITY COMMISSIONER

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये  Rs. 100

रु. 100  ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA  ◐ 2023 ◐  73AA 631660

ONLY FOR AFFIDAVIT ( ARTICLE-4)

01 NOV 2023

Reg. Serial No. 64853 Date Rs. 100/-

Stamp Purchaser Name Rupchand Dharmani

Place of Residence Pimpri Pune 17

Through Name self

Stamp Purchaser or through Sign.:-

Sign .:-

JAY D WANWARI Lic. No. 2201067

( Stamp Vendor ) Pimpri, Pune - 411017.

It is Compulsory the reason for which who has purchased stamp should be used by him for that reason only within 6 months from the date of purchase

वरिष्ठ कोषागार अधिकारी

18 OCT 2023

प्रथम मुद्रांक लिपीक
कोषागार पुणे कारिता

## प्रतिज्ञापत्र

मी, **श्री. रूपचंद दामनदास धर्मानी**, रा. पिंपरी, ता.हवेली, जि. पुणे- ४११०१७, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

मी **शिवनदास रेवाचंद धर्मानी एज्युकेशनल ट्रस्ट** या संस्थेची **सिक्कीबाई धर्मानी हायस्कूल** ह्या एकमेव शाळेचा अध्यक्ष आहे. आमची शाळा गेली **३५** वर्षांपासून पिंपरी या ठिकाणी कार्यरत आहे. आमच्या संस्थेच्या **सिक्कीबाई धर्मानी हायस्कूल** या शाळेस सन १९९१-१९९२ पासून इ. १ ली ते ६ वी पर्यंतच्या वर्गांना परवानगी दिली आहे. **जा.क्र. व्हीएलएस १०९१/५९६७प्राशि-३ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे-१** यांनी इ.१ली ते सन १९९१-१९९२ या शैक्षणिक वर्षांपासून सुरू असलेल्या प्रत्यक्ष वर्गासह आम्हाला दि. ०४/११/१९९१ रोजी जून-१९९३ पासून इयत्ता ७ वी वर्गास नैसर्गिक वाढीने प्रथम वर्ग म्हणून **शिक्षणाधिकारी (प्राथिमक) पुणे जिल्हा परिषद, पुणे** यांनी परवानगी दिली आहे. त्यानंतर ०४/०३/१९९४ रोजी आम्हांस **शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे** यांनी इयत्ता ८ वी वर्गास जून १९९३ पासून परवानगी दिली आहे. अशा पद्धतीने आम्हाला १ ली ते ८ वी प्राथमिक विभागाच्या परवानग्या मिळालेल्या असून, सदर सर्व कागदपत्रे आमच्याकडे उपलब्ध आहे. सदर कागदपत्रांच्या अधारे आम्हाला सन २०१६-२०१९ व सन २०१६-२०२२ अशा दोन स्वमान्यता प्राप्त झालेल्या आहेत.

प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकुर खरा व बरोबर असून, त्यात काही चूक अगर तफावत आढळून आल्यास मी भारतीय दंड विधान कलम १९९, २०० व १९३/२ नुसार शिक्षस पात्र राहीन हे मला मान्य आहे.

सदरचे प्रतिज्ञापत्र आज दिनांक ०१/११/२०२३ रोजी लिहून दिले असे.

Roop

**लिहून देणार**